**गृह (परिवहन) विभागामध्ये ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी नियुक्त केलेल्या सल्लागारांच्या सेवेच्या कालावधीस मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-१२१२/प्र.क्र.७४/परि-४,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २८ डिसेंबर २०१७.

वाचा :

१) माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचा शासन निर्णय क्र. GAD/मातंस०८०/४/२०१४-O/O Directorate of IT (MH), दि. ०१.०७.२०१४ व दि. ०९.१०.२०१७.
२) शासन निर्णय समक्रमांक दि. ०१.०१.२०१६ व दि. ३०.१२.२०१६.
३) परिवहन आयुक्त यांचे क्र.पआ/का.११/संगणक/आयटी सल्लागार/२०१७/जा.क्र.१६४०६, दि. ०२.१२.२०१७ व दि. ०६.१२.२०१७ ची पत्रे.

प्रस्तावना:-

मोटार वाहन विभागातील ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या संदर्भ क्र. १ वरील दि. ०१.०७.२०१४ च्या शासन निर्णयानुसार मे. के. पी. एम. जी. प्रा. लि. या संस्थेच्या २ वरिष्ठ व ५ कनिष्ठ तांत्रिक सल्लागारांची संदर्भाधिन क्र. २ च्या दि. ०१.०१.२०१६ व दि. ३०.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. सदर सल्लागारांची मुदत दि. ३०.११.२०१७ व दि. ३१.१२.२०१७ रोजी संपुष्टात येत आहे. माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि. ०९.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सर्व सल्लागारांच्या सेवा दि. ३१.०३.२०१८ किंवा त्यापुर्वी संपुष्टात आल्या पाहिजे अशा सुचना दिल्या आहेत. मोटार वाहन विभागात २ वरिष्ठ व ५ कनिष्ठ तांत्रिक सल्लागारांच्या सेवांना, माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि. ०९.१०.२०१७ च्या शासन निर्णयानुसार दि. ३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मोटार वाहन विभागात ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी नियुक्त केलेल्या मे. के.पी.एम.जी. प्रा. लि. या संस्थेच्या २ वरिष्ठ व ५ कनिष्ठ सल्लागारांच्या सेवेच्या कालावधीस दि. ३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर आदेश माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या शा. नि. क्र. GAD-मातंस०८०/४/२०१४-O/O- DIRECTORATE OF IT-DIT (MH) दि. ०९.१०.२०१७ मधील सुचनेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१२२८१७२६२६९३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2017.12.28 17:30:57 +05'30'

**(द.ह. कदम)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
३. मा. राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
४. महालेखापाल (लेखापरिक्षक) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर.
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. परिवहन उप आयुक्त (प्रशासन /संगणक/लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
७. उप सचिव (माहिती व तंत्रज्ञान संचालनालय), सा.प्र.वि. मंत्रालय, मुंबई.
८. उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१२.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग.
१३.निवड नस्ती, परिवहन-४.